**प्रेसनोट** **दिनांक १६/१२/२०२५**

**''राजेश पंढरीनाथ संखे, वय–५२ वर्षे, ग्रामपंचायत अधिकारी, नवापुर ग्रामपंचायत ता./जि.पालघर यांना रुपये २०,०००/– रक्कमेची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आलेले आहे. ''**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर |
| **पो.स्टे./गुन्हा रजि.नं./कायदा व कलम** | पो.स्टे.सातपाटी, स्टेशन डायरी नोंद क्रमांक ०९ दिनांक १६/१२/२०२५ रोजी १६:४९ वाजता. |
| **गुन्हा दाखल तारीख व वेळ** | पो.स्टे.सातपाटी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| **तक्रारदार** | पुरुष तक्रारदार वय.३२ वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | **राजेश पंढरीनाथ संखे वय ५२ वर्षे, ग्रामपंचायत अधिकारी, (वर्ग– ३), नवापुर जि.पालघर रा.कांचन छाया, फ्लट नं. १०३, सुखसागर गल्ली, माहिम रोड, पालघर, ता.जि. पालघर** |
| **मागितलेल्या लाचेची रक्कम** | रुपये २०,०००/– |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | रुपये २०,०००/– |

**थोडक्यात हकीगत:–** यातील तक्रारदार यांना त्यांचे जागेमध्ये तरंग तलाव व कृषी पर्यटनासाठी ३ रुम, त्यामध्ये उपहार व न्याहरी सुरु करण्यासाठी ग्रामपंचायत नवापुर येथून एन.ओ.सी. आवश्यक होती. त्यासाठी त्यांनी दि.३०/१०/२०२५ रोजी ग्रामपंचायत नवापुर येथे विनंतीअर्ज दिलेला आहे. कृषी पर्यटन अनुषंगाने उपहार गृहास एन.ओ.सी. देणेसाठी तक्रारदार यांचेकडे ग्रामपंचायत नवापुर येथील ग्रामपंचायत अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी **रुपये २०,०००/–** लाचेच्या मागणी केल्याने तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पालघर युनिट यांच्याकडे तक्रार दिलेली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. १६/१२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक राजेश संखे यांनी तक्रारदार यांच्याकडे रुपये २०,०००/– रक्कम लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर दि.१६/१२/२०२५ रोजी आयोजीत करण्यात आलेल्या सापळा कारवाईमध्ये तक्रारदार यांच्याकडुन लोकसेवक आलोसे राजेश पंढरीनाथ संखे यांना पंचासमक्ष रू.२०,०००/– रक्कमेची लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडुन ताब्यात घेण्यात आले असून त्याबाबत पालघर ग्रामीण येथील पो.स्टे. सातपाटी येथे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**सापळा पथक – पोलीस निरीक्षक श्री.राकेश डांगे, पोहवा/विलास भोये, आकाश लोहारे, जितेंद्र गवळे**
**तपास अधिकारी– पोलीस उप–अधीक्षक श्री.दादाराम करांडे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर**
**मार्गदर्शक अधिकारी – मा.श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा.श्री.भागवत सोनवणे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा.श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पालघर यांचेशी संपर्क करावा.

---

**संपर्क पत्ता :–** लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय कक्ष क्र. १०८, प्रशासकीय इमारत–'ब', जिल्हा मुख्यालय, पालघर–बोईसर रोड, कोळगाव, ता. जि. पालघर. पिनकोड – ४०१४०४.

संकेतस्थळ :– https://www.acbmaharashtra.gov.in
ई–मेल :– dyspacbpalghar-mum@mahapolice.gov.in
टोल फ्री नं. :– 1064
व्हॉट्सअॅप क्र. :– 8857971064 / 9769691064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297, 022-2081359, 022- 20813599
मोबाईल क्रमांक :– 8983217679/ 9004465175

**( दादाराम करांडे )**
पोलीस उप–अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पालघर
मोबाईल नं.– 8983217679